केंद्रभाग

# तुरीवर पानाफुलांची जाळी करणाऱ्या अळीचे नियंत्रण



**डॉ. पंकज पाटील**
(मो.नं. ७५८८९२११९६)

तुरीच्या पिकावर पाना-फुलांची जाळी करणाऱ्या या अळीचा प्रादुर्भाव फुलोऱ्यापासून मोठ्या प्रमाणात दिसून येतो. प्रौढ मादी पतंग पिवळसर रंगाची असते. उभट आकाराची अंडी पुंजक्यात शक्यतो झाडाच्या शेंड्यावर घातली जातात. अळी १४ मि.मी. लांब असून हिरवट पांढरा रंग असलेली, शरीराच्या दोन्ही बाजूस काळे ठिपके असलेली अशी असते.

कोषावस्था चंदेरी रेशमी जाळ्याने विणलेल्या अवस्थेत जमिनीत आढळते. कमी कालावधी असणाऱ्या जाती विशेष बळी पडतात. फुलोरा येण्याच्या कालावधीमध्ये जास्त आर्द्रता व मध्यम तापमान असते. सप्टेंबर, ऑक्टोबरमध्ये ही अनुकूलता या किडीस मिळाल्याने त्यांचे पुनरुत्पादन जलद होते. जास्त आर्द्रता असलेल्या भागात या किडीचा प्रादुर्भाव जास्त दिसून येतो.

**आर्थिक नुकसान पातळी**

५ अळ्या प्रति १० झाडे किंवा ५ टक्के शेंगाचे नुकसान.

नुकसानीचा प्रकार : अळी पाने, फुलकळ्या आणि शेंगा एकत्र करुन त्यांचा गुच्छ तयार करते व त्यात लपून उदरनिर्वाह करते. वाढणारे कोवळे शेंडे, पाने आणि शेंगा एकमेकांना चिकटल्यामुळे शेंगांचे प्रमाण कमी होऊन उत्पादन कमी होते.

**नियंत्रण**

१. सुरुवातीच्या काळात या किडीचा प्रादुर्भाव कमी असल्यास जाळी झालेली पाने, शेंडे व प्रादुर्भावग्रस्त फुले गोळा करुन नष्ट करुन टाकावीत.

२. किडीचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीच्या खाली असल्यास अझॅडिरॅक्टिन ०.०३ टक्के (३०० पी.पी.एम.) ५ मि.लि. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.

३. किडीचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीच्या वर गेल्यास नियंत्रणासाठी इंडोक्झाकार्ब १४.५ एस.सी. ७ मि.लि. किंवा ईमामेक्टिन बेन्झोएट ५ एस.सी. ४ ग्रॅम. किंवा क्लोरेंट्रिनिलिप्रोल १८.५ एस.सी. ३ मि.लि. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.



तुरीवर पानाफुलांची जाळी करणारी अळी



पानाफुलांची जाळी करणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव



अळीचा पतंग

■